**महाराष्ट्र औद्योगिक धोरण २०१३ नुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद घटकासाठी विशेष अभय योजना (स्पेशल ॲम्नेस्टी स्कीम)**

# महाराष्ट्र शासन

## उद्योग, उर्जा व कामगार विभाग

## शासन निर्णय क्रमांकः एसआयसी २०१३/प्र.क्र.५१/१३/उद्योग-१०

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: १ ऑगस्ट, २०१३

<u>वाचा -</u>

1. **शासन निर्णय क्रमांकः एसआयसी २०१३/प्र.क्र.५१/१३/उद्योग-१०, दिनांक २ मे, २०१३.**
2. **शासन शुध्दिपत्र क्र. एसआयसी २०१३/प्र.क्र.५१/१३/उद्योग-१०, दिनांक १ जुलै २०१३.**

<u>प्रस्तावना -</u>

महाराष्ट्र राज्याचा समतोल औद्योगिक विकास घडविण्यासाठी व त्याद्वारे आर्थिक विकास साधण्यासाठी आणि नवीन उद्योग घटकांच्या स्थापनेस चालना देण्यासाठी व त्याद्वारे रोजगाराच्या भरीव संधी निर्माण होण्यासाठी "महाराष्ट्र औद्योगिक धोरण २०१३" नुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद घटकांना सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध करुन देण्यासाठी विशेष अभय योजना (स्पेशल ॲम्नेस्टी स्कीम) वरील दिनांक २.५.२०१३ च्या शासन निर्णयानुसार सुरु करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता, खालीलप्रमाणे अधिकचे सुधारित आदेश देण्यात येत आहेत:-

## शासन निर्णय-

पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या बंद घटकांना बाहेर पडण्यासाठी विशेष अभय योजनेद्वारे उपलब्ध करुन दिलेल्या सुलभ निर्गमन पर्यायानुसार, पात्र ठरणा-या घटकास राज्य शासनाची सर्व मुद्दलाची रक्कम एक रकमी भरल्यास व्याज व दंडनिय रक्कम माफ करण्यात येते. सदर योजनेची अंमलबजावणी करताना खालील सुचनांचे पालन करण्यात यावे:-

१) घटक पुनरुज्जीवनक्षम नाही याबाबत संबंधित वित्तीय संस्थेकडून प्रमाणपत्र मिळाल्यास व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ने केलेल्या आजारी उद्योगाच्या व्याख्येनुसार घटक आजारी असल्याचे प्रमाणपत्र सनदी लेखापाल यांचेकडून प्राप्त झाल्यास अशा पात्र घटकाना "विशेष अभय योजना" लागू करण्यात यावी.

२) ज्या प्रकरणात वित्तीय संस्थेचा संबंध नाही अशा प्रकरणात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने केलेल्या व्याख्येनुसार घटक आजारी असल्याचे प्रमाणपत्र सनदी लेखापालाच्या प्रमाणपत्राच्या आधारे

प्राप्त केल्यास व घटक एक वर्षापेक्षा अधिक काळ बंद असल्यास सदर घटक पुनरुज्जीवनक्षम नाही असे गृहित धरुन “विशेष अभय योजना” लागू करण्यात यावी.

३) घटक बंद पडले असल्याबाबतचे पुरावे जसे की, विज पुरवठा खंडीत केल्याचा पुरावा, संबंधित विद्युत देयके, संबंधित कालावधीतील पाण्याची देयके, पाणी पुरवठा खंडीत केल्याचा पुरावा, उत्पादन बंद पडल्याच्या आर्थिक वर्षापासूनचे वार्षिक ताळेबंद यापैकी कोणताही पुरावा ग्राह्य धरण्यात येईल व त्यासोबत उद्योग घटकाने, घटक बंद पडल्याच्या दिनांका संबंधी प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

४) व्यवस्थापनामध्ये बदल म्हणजे घटकाने विशेष अभय योजनेचा लाभ घेतल्यानंतर पुनरुज्जिवित होणारा घटक-

(अ) कंपनी असेल तर त्याच्या भाग भांडवलातील नियंत्रक हितसंबंधामध्ये (कंट्रोलिंग इन्टरेस्ट) बदल.

(आ) भागीदारी संस्था असेल तर जुन्या भागीदार/ भागीदारांकडे नियंत्रक हितसंबंधांएवढी भागीदारी नसावी.

५) नवीन व्यवस्थापनाने त्याच ठिकाणी उत्पादक घटक सुरु करणे अपेक्षित आहे. पुनरुज्जिवित उद्योग घटकास उत्पादनात बदल करणे सुध्दा अनुज्ञेय राहील.

६) पूर्वीचा घटक असलेल्या ठिकाणी नवीन घटकाने पूर्वीच्या घटकाच्या स्थिर मालमत्तेएवढी (जमीनीची मुळ किंमत व इमारत आणि मशिनरीचे घसारा मुल्याएवढी) किमान गुंतवणुक करणे आवश्यक राहील. सदरची गुंतवणुक ही अभय योजना लागु झाल्यापासून तीन वर्षामध्ये करणे आवश्यक राहील.

७) विशेष अभय योजनेअंतर्गत विविध विभागांनी संबंधित उद्योग घटकास किती रकमेचा लाभ / सुट दिली याबाबतची माहिती उद्योग संचालनालय किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याकडे द्यावी.

८) विशेष अभय योजनेचा लाभ घेतलेल्या नवीन व्यवस्थापनाने त्यांना विशेष अभय योजना मंजूर झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या आत त्याठिकाणी नव्याने/ पुन: उत्पादन सुरु करणे आवश्यक राहील. तसे न केल्यास अभय योजनेअंतर्गत मंजूर केलेले लाभ द.सा.द.शे. १२% व्याजासह वसूली करण्यात येईल. ही वसुली ज्या विभागांनी लाभ दिला आहे त्यांनी करावयाची असून त्याबाबतची माहिती उद्योग संचालनालय किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याकडे द्यावी.

९) विशेष अभय योजना मंजूर केल्यानंतर संबंधित ठिकाणी घटक सुरु झाला किंवा नाही याचे संनियंत्रण उद्योग संचालनालय किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याने करावयाचे आहे.

१०) दिनांक २.५.२०१३ च्या शासन निर्णयातील तिनही निकष पूर्ण करणाऱ्या घटकास विशेष अभय योजनेनुसार सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध राहील.

११) सुशिक्षित बेरोजगार योजनांसाठी देखील हा शासन निर्णय लागू राहील.

१२) ही योजना राबविण्याचे / मंजूरीचे अधिकार संबंधित विभाग प्रमुख किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांना देण्यात येत असून योजनेचा लाभ घेण्यासाठी उद्योग घटकाने संबंधित विभाग प्रमुख किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांचेकडे विहित कालावधीत अर्ज करणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०८०२१४५९०७७७१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kishor Babanrao Kadam

Digitally signed by Kishor Babanrao Kadam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy & Labor, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Kishor Babanrao Kadam
Date: 2013.08.03 15:21:27 +05'30'

**( किशोर कदम )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

१. सचिव, वित्त मंत्रालय, (बँकीग विभाग) भारत सरकार, नवी दिल्ली
२. सचिव, उद्योग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली
३. गव्हर्नर, रिझर्व्ह बॅक ऑफ इंडिया, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
५. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
६. मा.मंत्री (उद्योग ) यांचे खाजगी सचिव
७. मा.राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
८. मा.मंत्री (सर्व) व मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
९. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
१०. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
११. मा. मुख्य सचिव
१२. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव
१३. विभागीय आयुक्त, कोकण विभाग / औरंगाबाद विभाग / पुणे विभाग / नाशिक विभाग /अमरावती विभाग / नागपूर विभाग.
१४. विकास आयुक्त (उद्योग), उद्योगसंचालनालय, मुंबई.